संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : १०४ वा ● ● रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

तीन नवे फौजदारी कायदे १ जुलैपासून लागू होणार

माणदेश एक्सप्रेस न्युज

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत भारतीय न्याय संहिता (द्वितीय सुधारणा) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (द्वितीय सुधारणा) (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष (द्वितीय सुधारणा) (बीएस-२०२३) अशी तीन विधेयके सादर करून ती मंजूर करून घेतली होती. त्यानंतर राष्ट्रपतींनीही या कायद्यांना संमती दिली. हिट अँड रन प्रकरणात जी तरतूद होती, त्याला देशभरातून विरोध झाला. या तरतुदीवर फेरविचार करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. तत्पूर्वी हे तीनही कायदे १ जुलैपासून देशात लागू केले जाणार, असे केंद्र

सरकारने शनिवारी (२४ फेब्रुवारी) जाहीर केले. ही तीन विधेयके ब्रिटिश काळातील अनुक्रमे भारतीय दंड संहिता (IPC) (१८६०), फौजदारी प्रक्रिया संहिता (CrPC) (१८८२) व भारतीय पुरावा कायदा (१८७२) या कायद्यांची जागा घेणार आहेत. हिवाळी अधिवेशनात सुधारीत तीनही कायद्यांना लोकसभा आणि राज्यसभेने मंजुरी दिली. तसेच २५ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही या कायद्यांना संमती देऊ केली. मागच्याच महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते की, टप्प्याटप्प्याने हे कायदे केंद्रशासित प्रदेशातही लागू केले जाणार आहेत.

जानेवारी महिन्यात देशभरातील काही वाहतूक संघटनांनी नव्या कायद्यातील हिट अँड रन तरतुदीबाबत आंदोलन केले होते. निष्काळजीपणामुळे किंवा भरधाव वाहन चालवित असताना कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्यास आणि संबंधित वाहन चालकाने तिथून पळ काढल्यास त्याला १० वर्षांचा तुरुंगवास आणि मोठा दंड भरावा लागणार होता. वाहतूक संघटनांनी देशभरातील वाहतूक अडवून तीव्र आंदोलन केल्यानंतर केंद्र शासनाने या कलमातील तरतुदी ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसशी सल्लामसलत करून अंतिम केल्या जातील, असे आश्वासन दिले होते.

केंद्र सरकारकडून देशभरात ३००० अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहे. हे अधिकारी पोलीस, तपास अधिकारी आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांना नव्या कायद्यातील तरतुदींबाबत मार्गदर्शन करणार आहेत. देशभरात विभागास्तरावर हे प्रशिक्षण पार पडेल. चंदीगडने ज्या पद्धतीचे ऑनलाईन पुरावे साठविण्याचे मॉडेल उभे केले आहे, त्याची माहिती संबंध देशाला करून दिली जाईल.

राष्ट्रवादीच्या निवडणूक चिन्हाचे आटपाडीत स्वागत !

माणदेश एक्सप्रेस न्युज

आटपाडी : देशाचे नेते, खासदार शरदचंद्रजी पवार साहेबांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाला केंद्रिय निवडणूक आयोगाने दिलेल्या या तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाचे किल्ले रायगड येथे अनावरण करण्यात आल्याचे पार्श्वभूमीवर या निवडणूक चिन्हाच्या निर्णयाचे आटपाडीत जोरात स्वागत करण्यात आले.

आटपाडी : येथे राष्ट्रवादीच्या निवडणूक चिन्हाचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित तालुकाध्यक्ष आनंदराव पाटील, भारतदादा पाटील, सादिक खाटिक व उपस्थित मान्यवर

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आटपाडी तालुका अध्यक्ष आनंदरावबापू पाटील, पक्षाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य भारतदादा पाटील, पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष सादिक खाटीक, ज्येष्ट नेते विष्णूपंत पाटील, पक्षाच्या महिला विभागाच्या तालुका अध्यक्षा प्रा.मोनिका पाटील इत्यादींच्या नेतृत्वाखाली निवडणूक चिन्हाच्या स्वागताचा समारोह करण्यात आला.

आटपाडी एस.टी. स्टॅन्ड समोरील रस्त्यावर फटाक्यांची आतषबाजी करीत, राष्ट्रीय नेते खासदार शरदचंद्रजी पवार साहेबांच्या, राज्याचे नेते जयंतराव पाटील साहेबांच्या, राष्ट्रवादी पक्षाच्या प्रचंड घोषणा देत आणि रणशिंगांच्या निनादात 'तुतारी वाजवणारा माणूस' या निवडणूक चिन्हाचे जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी यप्पावाडीचे सरपंच संभाजी माने, जयंत पाटील पतसंस्थेचे व्हा.चेअरमन सिध्देश्वर लवटे, मुरलीधर पाटील, जितेंद्र जाधव, मनोहर विभूते, रविंद्र लांडगे, अशोक लवटे, दत्ता हजारे, भारत दिवटे, रोहीत दिवटे, सदाशिव लांडगे, चंद्रकांत लांडगे, शंकर गळवे इत्यादी अनेक जण उपस्थित होते.

ट्रॅक्टर तलावात पडल्याने २२ जणांचा मृत्यू

माणदेश एक्सप्रेस न्युज

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशमधील कासगंज जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली. येथे प्रवाशांना घेऊन जाणारे एक ट्रॅक्टर ट्रॉलीसहित थेट तलावात पडल्यामुळे तब्बल २२ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये महिला तसेच लहान मुलांचाही समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार या ट्रॅक्टर ट्रॉलीत एकूण ४० जण बसलेले होते. यातील अनेकजण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीन्सुअर कासगंज जिल्ह्यातील गधाई गावाजवळ रियाजगंज-पटियाली रस्त्यावर हा अपघात घडला.

ट्रॅक्टरमधून प्रवास करणारे प्रवासी हे मूळचे एटा जिल्ह्यातील जैथारा गावातील होते. हे प्रवासी गंगेत स्नान करण्यासाठी ते कादरगंजकडे जात होते.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार ट्रॅक्टरचा वेग जास्त असल्यामुळे चालकाचा ट्रॅक्टरवरील तोल सुटला. ज्यामुळे अपघात झाला. तलावात पडलेल्या प्रवाशांना बुलडोझरच्या मदतीने बाहेर काढले जात आहे. तर जखमी प्रवाशांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातादरम्यान ट्रॅक्टर अन्य वाहनांवरही आदळले. त्यामुळे इतर वाहनांचाही यावेळी अपघात झाला. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे,असे किसनगंज पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान, या घटनेची दखल घेत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मृतांच्या नातेवाईकांना दोन लाखांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली आहे. तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत केली जाणार आहे.

बारस्कर यांचा देहू आणि देहू संस्थानशी संबंध नाही ; देहू संस्थानाचा खुलासा

माणदेश एक्सप्रेस न्युज

पुणे : मनोज जरांगे पाटील यांच्यावर आरोप करणाऱ्या अजय बारस्कर यांनी जरांगे यांना उपोषण सोडण्यासाठी संत तुकाराम महाराजांचा आदेश आहे, असे वक्तव्य केले. त्याचप्रमाणे बारस्कर यांनी मी देहूतून आलो आहे असे देखील सांगितले. त्यावर आता जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या वंशजांकडून प्रतिक्रिया देण्यात आली आहे. बारस्कर आणि आमचा काहीही संबंध नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

अजय बारस्कर

बारस्कर हा माणूस देहूतील नसून त्याला कोणत्याही प्रकारे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या नावाचा स्वतःच्या हितासाठी वापर करण्याचा अधिकार नसून अजय बारस्कर यांचा देहू आणि देहू संस्थानशी कोणताही संबंध नसल्याचे सांगण्यात आले आहे. तर देहू संस्थान हे मनोज जरांगे यांच्या पाठीशी असल्याचे देखील सांगण्यात आले आहे. कार्ला फाटा येथे रास्ता रोको आंदोलन झाल्यानंतर मावळ मधील मराठा आंदोलक हे देहूतील संत तुकाराम महाराजांच्या वंशजांना भेटण्यासाठी गेले. मनोज जरांगे पाटील यांच्याविषयी वक्तव्य करणाऱ्या अजय बारस्कर यांचा निषेध देहू संस्थान कडून व्यक्त करण्यात आला.

अजय महाराज बारसकर यांनी पत्रकार परिषद घेऊन मनोज जरांगे यांच्यावर तुफान हल्लाबोल केला होता. मनोज जरांगे खोटारडा माणूस आहे, तो रोज पलटी मारतो, त्याच्या अनेक गुप्त बैठका झाल्या, असे घणाघाती आरोप अजय बारसकर यांनी केले होते.

अजय बारसकर यांनी केलेल्या टीकेनंतर मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. अजय बारसकर हा सरकारचा ट्रॅप असून हा भोंदू महाराज असल्याची सडकून टीका जरांगे पाटील यांनी केली. अजय बारसकर यांनी केलेल्या आरोपांवर मनोज जरांगे पाटील यांनी हा सरकारी ट्रॅप असल्याचा आरोप केला होता.

सांगली विधानसभा मतदारसंघात ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशीनची जनजागृती

अपर तहसिलदार अश्विनी वरूटे : मतदान नोंदणी शिबीर व मतदार जागृती कार्यक्रमांचेही आयोजन

माणदेश एक्सप्रेस न्युज

सांगली : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २८२-सांगली विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रावर EVM² व VVPAT मशीनची दि. १० डिसेंबर २०२३ पासून जनजागृती मोहिम सुरु करण्यात आली आहे. सांगली विधानसभा मतदार संघामध्ये एकूण २९७ मतदान केंद्र असून त्यापैकी २७७ मतदान केंद्रावर जन जागृती मोहिम राबविण्यात आली असल्याची माहिती अपर तहसिलदार सांगली अश्विनी वरूटे यांनी दिली.

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता सावंत- शिंदे, जिल्हा पुरवठा अधिकारी आशिष बारकूल, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी मिना बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार नोंदणी, मतदार जागृती, ईव्हीएम, व्हीपॅट मशीन जनजागृती आदी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे अपर तहसिलदार अश्विनी वरूटे यांनी सांगितले.

जागृती हायस्कूल, चाणक्य चौक, कुपवाड येथे भटक्या विमुक्त जाती जमातीच्या मतदारांकरीता मतदान नोंदणी शिबीर व मतदार जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या ठिकाणी एतच्, VVPAT जन जागृतीसह मतदान नोंदणीबाबत मार्गदर्शन करून मतदान नोंदणीचे फॉर्म भरून घेण्यात आले. यावेळी अपर तहसीलदार सांगली अश्विनी वरुटे, नायब तहसीलदार रविंद्र सोनवणे, तलाठी स्वप्निल शिंदे आणि मुख्याध्यापिका व शिक्षक वर्ग आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ अखेर डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सर्वोदय शिक्षण मंडळ संचलित ल.पा. पाटील विद्यालय, जि.प.शाळा क्र. १ ते ३ व ग्रामपंचायत कार्यालय हरीपूर या ठिकाणी एतच् व VVPAT मशीनची जनजागृती करण्यात येणार आहे. सर्व मतदारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

निवडणुकीच्या अनुषंगाने दोन पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

माणदेश एक्सप्रेस न्युज

सांगली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संतोष डोके आणि अभिजीत देशमुख या दोन पोलिस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. जिल्ह्यातील कालावधी पूर्ण झाल्याने विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी या बदल्या केल्या आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर परिक्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येत आहेत. पोलीस अधीक्षक यांचे वाचक असणारे पोलीस निरीक्षक संतोष डोके यांची मुख्यालातून पुणे ग्रामीणला बदली करण्यात आली आहे. तर पोलीस मुख्यालयात असणारे अभिजित देशमुख यांची देखील पुणे ग्रामीणला बदली करण्यात आली आहे.

संतोष डोके

पुण्यात ट्रकने सात ते आठ वाहनांना दिली धडक

माणदेश एक्सप्रेस न्युज

पुणे : पुण्यातील कात्रजकडून नवले पुलाच्या दिशेने जाणार्या ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याची घटना घडली. या घटनेत सात ते आठ वाहनांना ट्रकने धडक दिली. यामुळे पुलावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कात्रजकडून नवले पुलाच्या दिशेने आज सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास एक ट्रक भरधाव वेगाने जात होता. तेवढ्यात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे पुढे असलेल्या सात ते आठ वाहनांना ट्रकने धडक दिली. या वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्या वाहनांमधील काही नागरिक किरकोळ जखमी झाले आहेत. त्या सर्व जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच त्या सर्वांवर उपचार सुरू असल्याचे सांगण्यात आले.

पुणे : नवले पुलावर ट्रकने दिलेल्या धडकेमध्ये सात ते आठ वाहनाचे मोठे नुकसान झाले.

कौठुळी हायस्कूला सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन भेट

माणदेश एक्सप्रेस न्युज

आटपाडी/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन असाव्यात असा मानस आहे. शाळेची ही गरज ओळखून कौठुळी सरपंच वर्षाराणी भारत कदम यांनी दि आटपाडी एज्युकेशन सोसायटीच्या महात्मा गांधी विद्यालय कौठुळी प्रशालेला २५००० रुपये किंमतीचे सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीनचे संपूर्ण युनिट भेट दिले.

आटपाडी : कौठुळी येथील महात्मा गांधी विद्यालय येथे सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीनच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच वर्षाराणी कदम व उपस्थित मान्यवर

कौठुळी हायस्कूलमध्ये दूरच्या वाडी वस्तीवरून येणाऱ्या मुलींच्या 'मेन्युस्ट्रियल हेल्थ अँड हायजिन' संदर्भातील अडचणी दूर करण्यामध्ये यश आलेले आहे. या वेंडिंग मशीनचे उद्घाटन आटपाडी एज्युकेशन सोसायटीचे सचिव पवार एच.यु., संस्थेचे इन्स्पेक्टर नामदास पी. जी. उपस्थित होते

या प्रसंगी सरपंच वर्षाराणी कदम यांचा प्रशालेतर्फे सत्कार करण्यात आलेला होता कौठुळी गावच्या मा. सरपंच सौ वर्षाराणी भारत कदम, निता कदम, तेजश्री कदम, भारतशेठ कदम, श्रीरंगआण्णा कदम, एम.पी. कदम, डेप्युटी सरपंच रणजित पाटील, दिनेश कदम, बापूसाहेब लोहार, संजय जावीर, महात्मा गांधी विद्यालय कौठुळीच्या मुख्याध्यापिका बनकर एस.बी. तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

सांगलीच्या शिक्षणाधिकाऱ्यावर कारवाई करा : राजेंद्र खरात

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाकडे केली निवेदनाद्वारे मागणी

माणदेश एक्सप्रेस न्युज

आटपाडी : मागासवर्गीय शिक्षक विनाकारण त्रास देणाऱ्या सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षणाशिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबतचे निवेदन सांगली जिल्हा आरपीआयचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरात यांनी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगा यांच्या केली आहे.

आटपाडी तालुक्यातील प्राथमिक शिक्षक जीवन आकाराम सावंत हे उपशिक्षक म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , कदमवस्ती (गोमेवाडी) येथे कार्यरत होते. त्यांच्यावर त्रयस्त व्यक्तीने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने व कोणत्याही सबळ पुराव्या अभावी केवळ जातीय द्वेषातुन मोहनराव गायकवाड, शिक्षणाधिकारी जि.प.सांगली यांनी जीवन आकाराम सावंत यांचेवर निलंबनाची कारवाई केलेली आहे.

राजेंद्र खरात

वास्तविकपणे जीवन सावंत हे विदयार्थी प्रिय शिक्षक असून त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झालेले आहेत. सदर प्रकरणी त्रयस्त व्यक्तीच्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांच्यावर चौकशी समितीच्या माध्यमातुन चौकशी केली असता चौकशी समितीच्या अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालमध्ये कोणत्याही प्रकारचा दोष आढळून आलेला नसल्याने सदर तक्रारी अर्ज हा निकाला काढण्यात आला होता. परंतु शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांनी जीवन सावंत यांच्याकडे संबंधीत तक्रारीबाबत ब्लॅकमेल करून वेळोवेळी पैशाची मागणी केलेली होती. संबंधीत तक्रारीमध्ये कोणत्याही प्रकारचा दोष नसताना जीवन सावंत यांनी पैशाच्या मागणीस टाळाटाळ केल्यामुळे मोहन गायकवाड यांची जातीय द्वेष उफाळून आला व त्यांनी जाणीवपूर्वक त्यांचेवर निलंबनाची कारवाई करणेत आलेली असल्याचे निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहेत.

त्यामुळे शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांच्यावर अट्रासिटी कायद्याने गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करण्यात यावे.अन्यथा आरपीआयच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राजेंद्र खरात यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

संपादकीय

बायजूचे भवितव्य अधांतरी

२०११ मध्ये बायजू रवींद्रन यांनी स्थापन केलेल्या बायजू ला फेसबुकचे संस्थापक मार्क झकरबर्ग यांच्या चान झकरबर्ग इनिशिएटिव्ह आणि टायगर ग्लोबल आणि जनरल अटलांटिक सारख्या प्रमुख इक्विटी कंपन्यांनी निधी दिला आहे. कोरोना काळात दीड वर्षांहून अधिक काळ शाळा बंद असल्याने लाखो भारतीय विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाकडे वळावं लागलं आणि यामुळे बायजू महत्त्वाची बाजारपेठ ठाले. कोरोनाची साथ सुरू झाल्यापासून या कंपनीने एखाद्या झपाट्याने प्रगती नोंदवली आहे. कंपनीकडे ६० लाखांपेक्षा जास्त नवीन सशुल्क युजर्स आले आणि यापैकी ८५ टक्के जणांनी सेवेचं नूतनीकरण केल्याचा कंपनीचा दावा आहे. बायजूने मार्च २०२० पासून १ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम उभी केली आहे आणि डझनभर प्रतिस्पर्ध्यांवर ताबा मिळवत त्यांना आपल्या छत्राखाली आणलं आहे. आता कोडिंग क्लासेसपासून ते स्पर्धात्मक परीक्षांसाठीचं कोचिंग देणाऱ्या अनेक फर्म्स बायजूच्या ताब्यात आहेत. बॉलिवूड सुपरस्टार शाहरुख खान ब्रँड ॲम्बेसेडर असणारा आणि टीव्हीवर सर्वाधिक जाहिराती झळकणारा हा ब्रँड आहे. परंतु असे काही कंपनी मध्ये झाले की, बायजू रवींद्रन यांची भागधारक यांनी हकालपट्टी केली.

तंत्रज्ञानाधारित ऑनलाइन शिकवणी मंच असलेल्या संस्थापक बायजू रवींद्रन आणि त्यांच्या कुटुंबीयांना 'गैरव्यवस्थापन आणि अपयश' या आरोपावरून कंपनीतील पदावरून दूर करण्याचा कौल ६० टक्क्यांहून अधिक भागधारकांनी शुक्रवारी दिला. तथापि भागधारकांनी बोलावलेल्या विशेष सर्वसाधारण सभेतील हे मतदान संस्थापकांच्या अनुपस्थितीत झाल्याने अवैध असल्याचा कंपनीने दावा केला.

रवींद्रन आणि त्यांचे कुटुंब या सभेपासून दूर राहिले आणि तेथे झालेले ठराव आणि त्यावरील मतदानही अवैध असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या सभेत गुंतवणूकदारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सुमारे ४० लोकांना प्रवेश देण्यात आला. दोन दिवसांपूर्वी कर्नाटक उच्च न्यायालयाने गुंतवणूकदारांच्या या निर्णयाला आव्हान देणाऱ्या रवींद्रन यांच्या याचिकेला दाखल करून घेतले, मात्र विशेष सर्वसाधारण सभेच्या आयोजनालाही न्यायालयाने परवानगी दिली. तथापि बैठकीत रवींद्रन यांच्या हकालपट्टीच्या ठरावावर झालेल्या मतदानाचा निकाल १३ मार्चपर्यंत लागू होणार नाही, असे उच्च न्यायालयाने बुधवारी स्पष्ट केले. बायजूची पालक कंपनी थिंक अँड लर्न प्रायव्हेट लिमिटेडमध्ये रवींद्रन आणि कुटुंबीयांची २६.३ टक्के मालकी आहे, तर बायजू यांची हकालपट्टी करण्यासाठी बोलविण्यात आलेली सभा डच गुंतवणूकदार कंपनी प्रोससच्या नेतृत्वाखालील ३२ टक्क्यांहून अधिक हिस्सेदारी असलेल्या भागधारकांनी बोलावली होती. रवींद्रन, त्यांची पत्नी आणि सहसंस्थापक दिव्या गोकुलनाथ आणि त्यांचा भाऊ रिजू रवींद्रन यांची हकालपट्टी करणाऱ्या ठरावाबाबत बैठकीच्या नोटिशीत उल्लेख होता. तथापि भागधारक करारानुसार, कोणत्याही गुंतवणूकदारांना कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा व्यवस्थापनात बदल करण्याचा मताधिकार नाही, असे 'बायजू'ने स्पष्ट केले आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात झपाट्याने वर गेलेल्या या कंपनीला तेवढ्यात झपाट्याने तोटा सहन करावा लागत असल्याने चक्क कंपनीच्या संस्थापकांची हकालपट्टीमुळे बायजू वरील लोकांचा भरोसा सध्या तरी उडालेला असून बायजूचे भवितव्य अंधकारमय बनले आहे.

तुतारी कायमच आणि चांगल्या वेळी वाजत असते : श्रीमंत शाहू महाराज

माणदेश एक्सप्रेस न्युज

कोल्हापूर : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष खासदार शरद पवारांनी मंगळवारी कोल्हापूर दौऱ्यावर असताना श्रीमंत शाहू महाराजांची भेट घेतली. बंद दाराआड दोघांमध्ये झालेल्या या चर्चेत कोल्हापूर लोकसभेच्या उमेदवारीवर खलबते झाल्याची चर्चा आहे. त्यानंतर आता श्रीमंत शाहू महाराजांना महाविकास आघाडीकडून ऑफर येण्याची शक्यता आहे.

श्रीमंत शाहू महाराज

ज्येष्ठ नेते खासदार शरद पवारांनी कोल्हापूर लोकसभेला श्रीमंत शाहू महाराज उमेदवार असतील तर आपल्याला आनंद होईल असं वक्तव्य केलं होतं. त्यानंतर महाविकास आघाडीकडून कोल्हापूर लोकसभेच्या मैदानात श्रीमंत शाहू महाराजांना उतरवलं जावू शकते अशी जोरदार चर्चा आहे. या राजकीय चर्चेनंतर आज एका कार्यक्रमानिमित्तानं कोल्हापुरातील ऐतिहासिक दसरा चौकात श्रीमंत शाहू महाराज आले होते. माध्यमांनी त्यांना लोकसभेच्या उमेदवारीवरून विचारलं असता त्यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, महाविकास आघाडीचा अद्याप फॉर्म्युला ठरलेला नाही. हा फॉर्म्युला ठरण्यात काही प्रॉब्लेम येणार नाही. तसंच, मला अजून ऑफर आलेली नाही. मात्र, ऑफर येण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीनं आपण सगळे मिळून वाटचाल करूयात, असं वक्तव्य करून महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळणार असल्याचे थेट संकेत महाराजांनी दिले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांना भारतीय निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह दिलं. त्यानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला कोणतं चिन्ह मिळणार याबाबत उत्सुकता होती. आता निवडणूक आयोगाने शरदचंद्र पवार गटाला तुतारी हे चिन्ह दिलं आहे. यावर बोलताना श्रीमंत शाहू महाराजांनी तुतारी कायमच सगळीकडं कोणत्याही कार्यक्रमात आणि चांगल्या वेळी वाजत असते, अशी प्रतिक्रिया दिली.

संत गाडगेबाबा हे चालते बोलते विद्यापीठ होते

डॉ.आर.एन.हरीदास : स्वेरीमध्ये संत गाडगेबाबा जयंती साजरी

माणदेश एक्सप्रेस न्युज

पंढरपूर : 'महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. राज्याला अनेक थोर संतांची परंपरा लाभलेली आहे. त्यापैकीच एक महान संत म्हणजे संत गाडगे महाराज होय. लोक त्यांना 'गाडगे बाबा' म्हणून देखील ओळखत असत. एक कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक अशी त्यांची ओळख होती.

अत्यंत साधेपणा, गरिबी, अंगावर फाटके तुटके परंतु स्वच्छ असणारे कपडे असे गाडगे बाबांचे राहणीमान होते. गाडगे महाराजांना सामाजिक न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयांत जास्त आवड होती. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांना भेटी देत असत.अनाथ, अपंग, दरिद्री व दुःखी लोक हेच त्यांचे दैवत होते. रंजल्या- गांजलेल्यांची सेवा हीच गाडगेबाबांची देवपूजा असायची.अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. लोकजीवन तेजाने उजळण्यासाठी हाती झाडू, खराटा घेवून गावोगावी ते पायी जात असत.

स्वेरीमध्ये संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करताना डावीकडून डॉ.एस.ए.लेंडवे, मृणाली माने, डॉ.एम.एम.आवताडे, प्रा.आर.एस.साठे, डॉ.आर.एन.हरीदास, प्रा.आर.पी.नागणे, अक्षय माने

दिवसा गाव स्वच्छ करायचे आणि रात्री ते कीर्तन करून जनजागृती करायचे.त्यामुळे संत गाडगेबाबा हे चालते बोलते विद्यापीठच होते.' असे स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सल्लागार डॉ.आर.एन. हरीदास यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्युट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा यांची १४८ वी जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी डॉ. हरीदास हे मार्गदर्शन करत होते.प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी डॉ.हरीदास यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्याचे महत्व सांगितले.स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.एस.ए.लेंडवे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस.मठपती, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.आर.एस.साठे, डॉ.डी.एस.चौधरी, डॉ.एम.एम. आवताडे, मृणाली माने, अक्षय माने इतर समन्वयक प्राध्यापक व विद्यार्थी आदी उपस्थित होते. प्रा.आर.पी.नागणे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

सांगोल्याचा लोकप्रतिनिधी निर्व्यसनी असावा : डॉ. बाबासाहेब देशमुख

माणदेश एक्सप्रेस न्युज

सोलापूर : आगामी लोकसभा आणि त्यापाठोपाठ होणाऱ्या विधानसभा निवडणुकांचे पडघम वाजत असताना सांगोला तालुक्यात शिवसेना शिंदे गटाचे आमदार ड. शहाजीबापू पाटील आणि शेकापचे दिवंगत ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ. बाबासाहेब व डॉ. अनिकेत देशमुख यांच्यातील संघर्ष वैयक्तिक स्तरावर पोहोचला आहे. सांगोल्याचा लोकप्रतिनिधी निर्व्यसनी असला पाहिजे आणि हीच तरुणांची भावना आहे, अशा शब्दांत डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आमदार ड. शहाजीबापू पाटील यांचा थेट नामोल्लेख टाळून टोला लगावला आहे.

डॉ. बाबासाहेब देशमुख

अनेक वर्षे रखडलेल्या ८८३ कोटी रुपये खर्चाच्या सांगोला उपसा सिंचन योजनेला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याचा दावा आमदार ड. शहाजीबापू पाटील यांनी अलिकडेच केला होता. त्यानंतर त्यांचा सांगोल्यात सत्कारही झाला होता. त्यावेळी बोलताना त्यांनी, गणपतराव देशमुखांच्या दोन्ही नातवांचे पार्सल त्यांच्या मूळगावी पेनूरला (ता. मोहोळ) परत पाठवून देईन, अशी गर्जना केली होती. त्यांच्या या विधानामुळे सांगोल्यात दोन्ही गटांतील राजकीय संघर्ष वैयक्तिक स्तरावर गेला असतानाच शेकापचे युवा नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आमदार शहाजीबापू पाटील यांचा कठोर शब्दांत समाचार घेतला.

पंढरपुरात आयोजित भारत कृषिप्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी डॉ. बाबासाहेब देशमुख आले असता त्यांनी आमदार ड. शहाजीबापू पाटील यांचा थेट नामोल्लेख टाळून त्यांना प्रत्युत्तर दिले. आगामी सांगोला विधानसभा निवडणुकीच्या निकालातून सूज्ञ मतदारच योग्य उत्तर देतील. आपला लोकप्रतिनिधी सुसंस्कृत, माणसांमध्ये रमणारा आणि महत्वाचे म्हणजे निर्व्यसनी असला पाहिजे, अशी मतदारांची धारणा आहे. याच अनुषंगाने तरुणाई आणि मतदार जनता आपल्याकडे आकर्षित होत आहेत, असा दावा त्यांनी केला.

महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पोचे उद्घाटन

संरक्षण उद्योगांना चालना देण्यासाठी नवे धोरण तयार करण्यात येईल : देवेंद्र फडणवीस

माणदेश एक्सप्रेस न्युज

पुणे : देशातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील पहिल्या 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो'चे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रात संरक्षण उद्योगाला चालना देण्यासाठी नवे धोरण तयार करण्यात येईल आणि या क्षेत्रातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पुणे : महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो'चे उद्घाटन करताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंचावर उपस्थित मान्यवर

मोशी येथील इंटरनॅशनल एक्झिबिशन एड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित या कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले.जनरल अजय कुमार सिंग, एअर मार्शल विभास पांडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, महेश शिंदे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, निबे लि. चे गणेश निबे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात २०१७ मध्ये एअरोस्पेस आणि डिफेन्स धोरण तयार केले आणि या क्षेत्राला चालना देण्यासाठी १ हजार कोटीचा निधी तयार करण्यात आला. त्यातून ६०० एमएसएमई तयार झाल्या आहेत. केवळ ३०० कोटीतून १२ ते १५ हजार कोटींचे मूल्य या उद्योग संस्थांनी तयार केले. आज जगातले सगळे देश संरक्षण क्षेत्रात भारतासोबत काम करण्यास तयार आहेत. या पार्श्वभूमीवर संरक्षण क्षेत्रातील एमएसएमईसाठी अधिक सुविधा आणि सवलती देण्याचे धोरण स्वीकारण्यात येईल. रोजगार निर्मितीसोबत चांगली शस्त्रास्त्रे राज्यात तयार होतील याचेही प्रयत्न करू, असे श्री.फडणवीस म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाची शक्ती ओळखली. आपला देश शस्त्रास्त्रांसाठी परदेशावर अवलंबून होता. आज जगाच्या पाठीवर सामरिक शक्तीत पहिल्या पाचमध्ये असलेले देश स्वत:ची संरक्षण सामग्री स्वत:च्या देशात तयार करून जगाला निर्यात करतात. हीच क्षमता देशात निर्माण करण्यासाठी 'मेक इन इंडिया' वर भर देण्यात आला. भारताने शस्त्र निर्यात करणाऱ्या देशांसाठी त्याचा काही भाग भारतात उत्पादन करावा लागेल आणि निर्मिती तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करावे लागेल अशी अट ठेवली. म्हणून देशात संरक्षण उत्पादन क्षमता निर्माण झाली. जगातील उत्तम शस्त्रसामुग्री देशात निर्माण होत आहे. यामुळे देशाचे लाखो कोटी रुपये वाचले आहेत आणि आपली वाटचाल आत्मनिर्भरतेकडे सुरू आहे. विमान आणि युद्धनौकेसाठी लागणारा ३० टक्के दारुगोळा भारतात तयार होत आहे, असेही श्री.फडणवीस म्हणाले.

कार्यक्रमाला पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा आदी उपस्थित होते.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
माणदेश एक्सप्रेस

डिजीटल जम्बो नेत्रा कलर झेरॉक्स
Email - netra7676@gmail.com
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११

नीरा कालवे सल्लागार समितीची बैठक संपन्न

माणदेश एक्सप्रेस न्युज
पुणे : नीरा डावा कालव्याचे पहिले उन्हाळी आवर्तन १६ मार्चपासून तर नीरा उजव्या कालव्याचे उन्हाळी आवर्तन ८ मार्चपासून सोडण्यात यावे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नीरा उजवा कालवा व नीरा डावा कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ठरले.
या बैठकीस आमदार दत्तात्रय भरणे, समाधान अवताडे, शहाजी पाटील, राम सातपुते, माजी आमदार दीपक साळुंखे- पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हणुमंत गुणाले, अधीक्षक अभियंता सुनंदा जगताप आदींसह समितीचे निमंत्रित सदस्य उपस्थित होते.
उपसा सिंचन योजनेच्या वीजबिलात शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने चालू आर्थिक वर्षात मार्च २०२४ पर्यंत ६७५ कोटी रुपये अनुदान ऊर्जा विभागाला उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. हा बोजा शासनाने उचलला असल्याने शेतकऱ्यांना वीजबिलाची झळ बसली नाही. पुढील आर्थिक वर्षातील एप्रिल २०२४ पासून पहिल्या चार महिन्यांसाठी लेखानुदानात यासाठीची आणखी तरतूद करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले. आमदार श्री. भरणे यांच्यासह निमंत्रित सदस्यांनी सूचना केल्या.
थकीत पाणीपट्टी वसुलीसाठी साखर कारखान्यांनी सहकार्य करण्याची विनंती पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली.
कालव्याच्या शेवटच्या भागात (टेल) कालव्याद्वारे सोडलेले पाणी वाया जाऊ नये यासाठी लोकप्रतिनिधींनी जलसंपदा विभागाला सहकार्य करावे, असेही श्री. पवार म्हणाले. एकवेळ पाणी सोडलेले असताना शेतकऱ्यांकडे चारवेळची पाणीपट्टीची मागणी करण्यात येत असल्याचे लोकप्रतिनिधी म्हणाले. त्यावर योग्य ती माहिती तपासून नियमाप्रमाणे पाणीपट्टी भरुन घेऊन पुढील पाणी मागणीचे अर्ज घ्यावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

पुणे : येथे नीरा कालवे सल्लागार समितीची बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित संपन्न झाली. यावेळी बैठकीला उपस्थित आमदार व कालवे सल्लागार समितीचे सदस्य

नीरा डावा कालव्याचे पहिले आवर्तन ५६ दिवसांचे
नीरा उजवा कालवा उन्हाळी हंगाम सिंचन व बिगरसिंचनासाठी ६.६३७ टी.एम.सी. उपलब्ध असून उन्हाळी दोन आवर्तने सोडण्याचे नियोजन आहे. योग्य नियोजनाने रब्बी हंगामातील पाणी वाचल्यामुळे तेच आवर्तन १५ मार्चपर्यंत चालणार असून उन्हाळी पहिले आवर्तन १६ मार्चपासून सोडण्याचे नियोजन आहे. त्यानंतरचे आवर्तन ११ मेपासून सोडण्याचे नियोजन असून लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांच्या त्यावेळच्या मागणी आणि परिस्थितीनुसार यामध्ये आवश्यक तो बदल करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

नीरा उजवा कालव्याचे ७० दिवसांचे आवर्तन
नीरा उजवा कालवा उन्हाळी हंगाम सिंचन व बिगरसिंचनासाठी ९.७९५ टी.एम.सी. पाणीवापराचे नियोजन असून वीर व फलटणसाठी ८ मार्चपासून ७० दिवसांचे आवर्तन तर माळशिरस व माचणूरसाठी १० मार्चपासून ७१ दिवसांचे आवर्तन देण्याचे नियोजन असल्याचे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. शाखा क्र. २, पंढरपूर आदींचेही योग्य नियोजन करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आमदार संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल

माणदेश एक्सप्रेस न्युज
बुलढाणा : वादग्रस्त वक्तव्यांनी चर्चेत राहणारे शिवसेना शिंदे गटाचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. चार दिवसांपूर्वी त्यांनी केलेले एक वक्तव्यामुळे ते चर्चेत आले आहेत. आमदार गायकवाड यांनी बुलढाणा येथील शिवजयंती कार्यक्रमात एका स्थानिक वृत्तवाहिनीला मुलाखत देताना वादग्रस्त विधान केले. या मुलाखतीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सर्वत्र खळबळ उडाली. या व्हिडिओत त्यांनी आपल्या गळ्यातील लॉकेटमध्ये वाघाचा दात असून १९८७ मध्ये आपण वाघाची शिकार केल्याचे विधान केले आहे. या त्यांच्या वक्तव्यानंतर सोशल मीडियावर त्यांनी केलेल्या शिकारीची चर्चा जोरदार आहे. वनविभागाने त्यांच्यावर आज (दि.२४) याप्रकरणी गुन्हा दाखल केला.


संजय गायकवाड

वनविभागाने आमदार गायकवाड यांच्या वक्तव्याची गंभीरतेने दखल घेतली व वनपरिक्षेत्र अधिकारी अभिजित ठाकरे यांच्या पथकाने याप्रकरणी गुरुवारी (दि. २३) आ. संजय गायकवाड यांचे बयाण नोंदवले. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील कथित वाघाचा दात जप्त करून वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ नुसार आ. गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल केला. जप्त करण्यात आलेला वाघाचा दात हा वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूट डेहराडून येथे डीएनए तपासणीसाठी पाठवला जाणार आहे.तेथून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल.
वाघ हा प्राणी संरक्षित अधिसुची एक मध्ये असून त्याची शिकार करणे वा त्याचे अवयव अंगावर बाळगणे हा दखलपात्र गंभीर गुन्हा आहे. गुन्हा सिद्ध झाल्यास तीन वर्षांच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेची कायद्यात तरतूद आहे. अशी माहिती वनविभागातील सुत्रांनी दिली.

फॅबटेक पॉलिटेक्निक मध्ये पालक सभा संपन्न

सांगोला : येथील फॅबटेक पॉलिटेक्निक मध्ये पालक सभा संपन्न संपन्न झाली . यावेळेस सभेमध्ये उपस्थित पालक वर्ग

माणदेश एक्सप्रेस न्युज
सांगोला : येथील फॅब्रटेक पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये प्रथम वर्षाची पालक सभा संपन्न झाली.मीना निंब्याळ व समाधान सावंत या पालकांची पालक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली. प्रथम वर्ष विभागाचे विभागप्रमुख प्रा.अनिल वाघमोडे यांनी विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, रात्र अभ्यासीका,प्राणायाम, विषयवार चाचणी परीक्षा यांची माहिती दिली.
पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.तानाजी बुरुंगले यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांची हजेरी कमी असेल तर महाविद्यालयास शैक्षणिक गुणवत्ता पुरविण्यास अडचणी निर्माण होतात त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांच्या १०० टक्के हजेरी साठी महाविद्यालयास सहकार्य करण्याचे आवाहन केले. डायरेक्टर डॉ.डि.एस.बाडकर यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी हिवाळी परीक्षा २०२३ मध्ये मिळविलेले गुण हे १० वी च्या बोर्डाच्या गुणांपेक्षा जास्त आहेत आणि हे वाढलेले गुण हीच फॅब्रटेक ची गुणवत्ता असल्याचे सांगितले. संस्थेचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ.अमित रुपनर यांनी पालकांच्या संस्थेकडून असणाऱ्या शैक्षणिक अपेक्षा पूर्ण करण्यास संस्था सदैव कटिबद्द असल्याचे सांगितले. प्रारंभी महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळ यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या हिवाळी २०२३ परीक्षेत व घटक चाचणी १ परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच १०० टक्के हजेरी असलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.या पालक सभेस पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नागेश लेंगरे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा.संगीता खंडागळे यांनी केले.

सर्वांचे घराचे स्वप्न पूर्ण करणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे : प्रत्येक सर्वसामान्य व्यक्तीचे स्वतःचे घर असावे, असे स्वप्न असते. हे शासन सर्वांच्या घराचे स्वप्न पूर्ण करणार, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ठाणे येथील राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृह, आयोजित कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा विभागीय घटक) म्हाडा सदनिका सोडत २०२३-२४ संगणकीय सोडत कार्यक्रमात ते बोलत होते. कोंकण विभागातील ५ हजार ३११ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत आयोजित केले होती. यावेळी गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, विधानपरिषद आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय केळकर, माजी आमदार रवींद्र फाटक, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मारोती मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, अन्न, वस्त्र व निवारा ही काळाची व समाजाची मूलभूत गरज आहे. त्यासाठी केंद्र व राज्य शासन सर्वातोपरी प्रयत्न करीत आहे. प्रधानमंत्री आवास योजना ही शहरी व ग्रामीण या दोन्ही भागात राबविली जाते. अल्प उत्पन्न गट, अत्यल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील लोकांना या सदनिकांचे सोडतीद्वारे वाटप करण्यात येते. प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये आपल्याला केंद्राकडून मोठ्या प्रमाणात मदत मिळत आहे. राज्य शासनाकडून सर्वांसाठी मोठ्या प्रमाणावर घरे निर्माण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. गिरणी कामगारांना देखील घरे देण्यास सुरुवात केली आहे. राज्य शासन अनेक गरजू कुटुंबांना घर देत आहे. हे सर्वसामान्यांचे शासन असून सर्व कामकाज पारदर्शक पद्धतीने चालले आहे. पायाभूत सुविधा पुरविण्यावर भर देण्यात येत आहे.
ते पुढे म्हणाले की, आपल्या देशाची अर्थव्यवस्था प्रगतीपथावर असून आता अर्थव्यवस्थेमध्ये आपला देश जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. देशात आणि राज्यात सर्वांगीण विकास होताना दिसतोय. शासनाकडून देण्यात येणारी ही सर्व घरे वेळेमध्ये पूर्ण झाली पाहिजेत. जे वेळेत घर पूर्ण करतील त्यांना सन्मानित करण्यात येईल, तर जे काम वेळेत पुर्ण करणार नाहीत त्यांना निश्चितच दंड आकारण्यात येईल.
शेवटी म्हाडा सदनिका सोडत २०२३-२४ मध्ये ज्यांना घरे मिळाली आहेत त्या सर्वांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी म्हाडाचे अधिकारी-कर्मचारी, सोडतीमध्ये भाग घेतलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm १०००/- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २०००/- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३०००/- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४०००/- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६

व्यावसायिक शिक्षण, शिष्यवृत्तीचा लाभासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी गरजेचे

नंदिनी आवडे : जत येथे जात प्रमाणपत्र पडताळणी शिबीर संपन्न

माणदेश एक्सप्रेस न्युज
सांगली : विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाकरिता व विविध शिष्यवृत्तीचा लाभ घेण्याकरिता जात प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती सांगली च्या अध्यक्षा नंदिनी आवडे यांनी केले.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था व जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी सांगली यांच्या वतीने श्री रामराव विद्यामंदिर जत येथे जात प्रमाणपत्र पडताळणी शिबीर संपन्न झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.
यावेळी जत पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी अन्सार शेख, जिल्हा प्रकल्प अधिकारी गणेश सवाखंडे, प्राचार्य श्री. बनसोडे आदी उपस्थित होते.
या कार्यक्रम प्रसंगी श्रीमती नंदिनी आवडे यांनी जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विविध महसूल पुरावे व शैक्षणिक पुरावे कशा पद्धतीने शोध घेऊन त्याची पूर्तता करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या व्यतिरिक्त व्यवसायाच्या निगडित असणारे विविध पुरावे याबाबतही मार्गदर्शन केले.

श्री रामराव विद्यामंदिर जत येथे जात प्रमाणपत्र पडताळणी शिबीर प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती सांगली च्या अध्यक्षा नंदिनी आवडे, मंचावर उपस्थित मान्यवर

विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी करताना स्वतःचा ईमेल आयडी किंवा पालकांचा ईमेल आयडी व पालकांचा संपर्क नंबर देणे अत्यंत आवश्यक आहे. स्वतःच्या व पालकांच्या ईमेल आयडी वरूनच जात प्रमाणपत्र पडताळणी ऑनलाईन प्रक्रिया करावी, जेणेकरून ऑनलाईन जात प्रमाणपत्र पडताळणी मिळण्यास अर्जदारास अडचण येणार नाही. यामुळे कागदपत्राबाबत काही त्रुटी असतील तर ते ईमेल द्वारे व संपर्कद्वारे पालकांना समजतील व जात प्रमाणपत्र पडताळणी बाबतची त्रुटी पूर्तता लवकर करता येईल व पाल्यांचे वेळेत जात प्रमाणपत्र पडताळणी होवून जात प्रमाणपत्र पडताळणी ऑनलाईन उपलब्ध होईल, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. तसेच उपस्थितांच्या प्रश्नांचे निरासरनही श्रीमती आवडे यांनी यावेळी केले. समतादूत प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी गणेश सवाखंडे यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी वेळेत करून शैक्षणिक नुकसान टाळावे, असे आवाहन केले. यावेळी त्यांनी जात पडताळणी कशी करावी याबाबत इयत्ता अकरावी सायन्सच्या विद्यार्थ्यांना व उपस्थित पालकांना सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी वेळेत जात पडताळणी करून भावी काळात मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतींचा लाभ घ्यावा, व्यवसाय शिक्षणात शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ऑनलाईन अर्ज कसा करावा यासाठी आवश्यक असणारे कागदपत्र, वंशावळ कशी करावी, जातीचे प्रमाणपत्र, मूळ कागदपत्र, महसूल पुरावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जाती प्रमाणपत्र समिती सांगली यांच्यावतीने संपूर्ण सांगली जिल्ह्यातील कॉलेजमध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.
प्रास्ताविक स्नेहलता ठोमरे तर सूत्रसंचालन प्रा.सकपाळ यांनी केले.आभार जत पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी अन्सार शेख यांनी मांनले. कार्यक्रमास कवठेमहांकाळ समतादूत आबासाहेब भोसले, सलीम गवंडी, बंटी दुधाळ, विक्रम ढोणे, हेमंत चौगुले, श्री.मिसाळ, जत तहसील कार्यालयाचे प्रतिनिधी, शिक्षक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रांतिवीर शाळेने पटकवले तीन लाख रुपयाचे बक्षीस

माणदेश एक्सप्रेस न्युज
म्हसवड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी शाळा म्हसवडने माण तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला असून शाळेला तीन लाख रुपयाचे बक्षीस मिळणार आहे. महाराष्ट्र शासन शिक्षण विभागामार्फत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम राबवला जात आहे.तालुकास्तरावरील मूल्यांकन समितीने नुकतीच तालुक्यातील अनेक शाळांची पाहणी केली. शाळेतील उपक्रमशीलता व गुणवत्ता याबाबत मूल्यांकन समितीने मूल्यमापन केले .त्याचा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला. खाजगी व्यवस्थापन गटातून माण तालुका स्तरावर क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी शाळा म्हसवड ने प्रथम क्रमांकाचा बहुमान पटकावला आहे.त्यासाठी शाळेला शासनातर्फे तीन लाख रुपयाच्या बक्षीस मिळणार आहे.

म्हसवड : महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात प्रथम क्रमांक पटकाविलेली क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी शाळा व शाळेतील विद्यार्थी

यापूर्वीही राज्य पातळीवर शाळेची आंतर राष्ट्रीय दर्जाची शाळा म्हणून निवड झालेले आहे. त्याबरोबरच राज्यस्तरीय वनश्री पुरस्कार तसेच स्वच्छता मॉनिटर साठी क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी शाळा व मुख्याध्यापिका सुलोचना बाबर यांचा सन्मान झालेला आहे.शाळेच्या सर्वांगीण दर्जात्मक प्रगतीसाठी मुख्याध्यापिका सुलोचना बाबर तसेच शाळेतील सर्व शिक्षकानी विशेष परिश्रम घेतले.

माण तालुक्याचे गटविकास अधिकारी प्रशांत राऊत, गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण पिसे,विस्तार अधिकारी रमेश गंबरे, केंद्रप्रमुख बाळासाहेब पवार, अशोक गंबरे, कृषी विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृषिरत्न विश्वंभर बाबर तसेच पालक प्रतिनिधी यांनी शाळेने तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षक यांचे अभिनंदन केले.

ऊसतोड कामगारांच्या वारसदारांना धनादेशाचे वाटप

माणदेश एक्सप्रेस न्युज
पुणे : लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्यावतीने जिल्ह्यातील मृत्यू झालेल्या दोन ऊसतोड कामगारांच्या वारसांना देण्यात येणाऱ्या प्रत्येकी ५ लाख रुपयांच्या धनादेशाचे वाटप उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.याबद्दल वारसदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले.


पुणे : ऊसतोड कामगारांच्या वारसांना धनादेशाचे वाटप करताना उपमुख्यमंत्री अजित पवार व उपस्थित मान्यवर

यावेळी आमदार चेतन तुपे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिनेश डोके, व्यवस्थापक बाळासाहेब सोळंकी, समाज कल्याण सहायक आयुक्त विशाल लोंढे, बबन माने आदी उपस्थित होते.

ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचा अपघाती मृत्यू झाल्यास अशा व्यक्तीचे कुटुंबिय, वारसदारांना महामंडळाच्यावतीने ५ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य करण्यात येते. शासनाने बीड जिल्ह्यातील ३१, जालना ३, धाराशिव-७, अहमदनगर २३ आणि पुणे ३ असे एकूण ६७ प्रस्तावाकरीता ३ कोटी ३५ लाख रुपये संबंधित जिल्ह्यांना वर्ग केले आहे.

पुणे जिल्ह्यातील स्व.यादव क्षीरसागर आणि स्व.उमेश चव्हाण या ऊसतोड कामगाराचा अपघाती मृत्यू झाला होता, त्यांच्या वारसदार शिवकन्या क्षीरसागर आणि सुशीला चव्हाण यांना धनादेश सुपूर्द करण्यात आले. उर्वरित एका वारसदाराला लाभ देण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

तुतारी चिन्हाचं रायगडावर अनावरण

माणदेश एक्सप्रेस न्युज
रायगड : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाला तुतारी वाजवणारा माणूस हे पक्षचिन्ह दिले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी हे चिन्ह वापरता येणार आहे. त्याआधी या चिन्हाच्या अनावरण सोहळ्यासाठी शरद पवार गटाकडून मोठं शक्तीप्रदर्शन करण्यात आले. ऐतिहासिक असलेल्या या चिन्हाचं अनावरण किल्ले रायगडावर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन भूमित जाऊन शरद पवारांच्या हस्ते या चिन्हाचं अनावरण करण्यात आलं आहे. दरम्यान, यानंतर शरद पवारांनी जनतेशी संवाद साधताना तुतारी जनतेला प्रेरणा देईल, असा विश्वास निर्माण केला.

रायगड : येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या 'तुतारी वाजवणारा माणूस' या पक्षाचे चिन्हाचे अनावरण करताना शरद पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे व उपस्थित पक्षाचे पदाधिकारी

शरद पवार पालखीतून गडावर दाखल
तुतारी हे राज्याचे ऐतिहासिक वाद्य आहे.त्यामुळे पक्षाला ऐतिहासिक चिन्ह मिळाले असल्याचा दावा सातत्याने केला जातोय. यानिमित्ताने या पक्षाच्या चिन्हाचे अनावरण रायगड किल्ल्यावर करण्यात आले. वयोमानानुसार, शरद पवारांना रायगड किल्ला सर करणे अवघड होते.परंतु, रोपवे आणि पालखीमुळे त्यांना रायगड किल्ल्यावरचा प्रवास सुकर झाला. आधी ते रोप वेने रायगडावर पोहोचले.तर नंतर त्यांनी पालखीचा आधार घेतला.जवळपास ४० वर्षांनंतर ते किल्ले रायगडावर आले आहेत.

प्रेरणा घेऊन सेवा करूयात
निवडणूक आयोगाने रणशिंग फुंकायला तुतारी दिली आहे.संघर्षातून प्रेरणा देणारी ही तुतारी आहे.तुमच्या संघर्षातून, त्यागातून यश मिळणार याची खात्री आहे.या ऐतिसाहिक भूमीत आपण आलोय.या ठिकाणाहून प्रेरणा घेऊन जनतेची सेवा करुया, असंही आवाहन शरद पवारांनी केलं.

सध्याचा संघर्ष हा वैचारिक आहे. या देशात अनेक राजे झाले, संस्थानिक झाले परंतु रयतेचा राजा एकच झाला. सध्या राज्यात अडचणी वाढतील अशी स्थिती आहे. शिवछत्रपतींचे राज्य सामान्यांची सेवा करणारे राज्य होते. आज महाराष्ट्राची स्थिती बदलायची असेल तर पुन्हा एकदा याठिकाणी जनतेचे राज्य येईल यासाठी प्रयत्न करावे लागतील, असं शरद पवार म्हणाले.

मीच कंपनीचा सीईओ, बाकी सर्व अफवा : बायजू रवींद्रन

माणदेश एक्सप्रेस न्युज
नवी दिल्ली : मी आजही कंपनीचा सीईओ आहे.व्यवस्थापनात कोणताही बदल झालेला नाही. मला पदावरुन हटवले, ही अफवा आहे, असे एज्युकेशन टेक्नॉलॉजी कंपनी 'बायजू'चे संस्थापक बायजू रवींद्रन यांनी कर्मचार्यांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे. गैरव्यवस्थापन आणि अपयशचा ठपका ठेवत 'बायजू'च्या ६० टक्के गुतवणूकदारांनी बायजू रवींद्रन यांना सीईओ पदावरुन हटवावे तसेच त्यांना कंपनीच्या मंडळातून काढून टाकावे, यासाठी मतदान केले होते. यानंतर रवींद्रन यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पत्रात रवींद्रन यांनी म्हंटले आहे की, कंपनीच्या सर्वसाधारण सभेत अनेक महत्त्वाच्या नियमांचे उल्लंघन झाले. या बैठकीत काही निर्णय हे नियमबाह्य होते. माझ्या कंपनीचा सीईओ म्हणून मी तुम्हाला हे पत्र लिहित आहे. मीच कंपनीचा सीईओ राहणार आहे. व्यवस्थापनात कोणताही बदल होणार नाही आणि मंडळही तसेच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. बाकी सर्व अफवा आहेत. गुंतवणूकदारांची बैठकीला योग्य संख्याबळ नव्हते. या बैठकीत किमान एका संस्थापक संचालकाची उपस्थिती आवश्यक होती, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

मनोज जरांगे पाटलांच्या विरोधात आज अजय बारसकर बॉम्ब टाकणार

माणदेश एक्सप्रेस न्युज
मुंबई : मनोज जरांगे पाटील कोणत्या व्यक्तीला आमदार बनायचं स्वप्न दिलं आहे त्याचे पुरावे माझ्याकडे आहेत. जरांगे पाटलांच्या नातेवाईकांकडे कसे काय ४५ डंपर आले, याची चौकशी करण्यासाठी मी ईडीकडे जाणार असल्याचे अजय बारसकर यांनी म्हणत, त्यांच्याविरोधात आज बॉम्ब टाकणार असल्याचे ते म्हणाले.

ते म्हणाले की, मी महाराज सोबत वकील पण आहे. माझ्याकडे त्यांचा पुरावा असून माझ्याकडे मनोज जरांगेंची रेकॉर्डिंग आहे, आज मी मनोज दादा बोलत आहे. मनोज जरांगे पाटील लोणावळामध्ये बंद दाराआड का मीटिंग घेतली? असा मी प्रश्न विचारला. बंद दाराआड तुमची काय डील झाली? १४ तारखेला जी सभा झाली त्यामध्ये जरांगे पाटील यांनी सहा मागण्या केल्या होत्या. त्या सभेमध्ये तुम्ही समाजाची मागणी मान्य केली. लोणावळामध्ये सरसकट शब्द सोडून दिले. बंद दाराआड बैठक झाल्यानंतर लोणावळामध्ये सरसकट शब्द का सोडला? अंतरवली मागणीमध्ये ज्या ४५ बांधवांनी आत्महत्या केली त्यांच्यासाठी सरकारी नोकरी का सुटली? अशी विचारणा त्यांनी केली. २०१७ मध्ये मनोज जरांगे पाटील याची काय मागणी होती ते अजय बारसकर यांनी दाखवत ओबीसीपेक्षा वेगळ्या आरक्षणची मागणी जरांगे पाटील यांची होती. मात्र, आता बदलला आणि कुणबी दाखला पाहिजे. जरांगे यांनी आरोप केला त्या महिलेला आणा, असेही ते म्हणाले.मनोज जरांगेंवर पुण्यामध्ये फसवणुकीची केस आहे. जरांगे बोलतात मी ट्रॅप आहे, ट्रॅप कोणावर होतो जो काळा धंदा करतो. ते काळा धंदा करतात का? ज्या पिटीशनमुळे गायकवाड कमिटीचा आरक्षण आले ते माझ्यामुळे आले. उद्या ११ वाजता इथे बॉम्ब स्पॉट होणार आहे. जरांगे कसा आहे त्याबद्दल बॉम्ब फोडणार आहे, असे ते म्हणाले.

दुसरीकडे, राज्य सरकारकडून मराठ्यांना स्वतंत्र १० टक्के आरक्षण देण्याच्या निर्णय आल्यानंतर अवघ्या काही तासांमध्येच अजय बारसकर यांनी मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्यावर आरोप केले होते. यानंतर आता मराठा समाजाच्या रोषाला अजय बारसकर यांना जावं लागलं आहे. अजय बारसकर यांच्यावर काल (२३ फेब्रुवारी) मुबंईत हल्ल्याचा प्रयत्न झाला. चर्चगेट परिसरामध्ये बारसकर प्रवास करत असताना काही लोकांनी त्यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाला होता. मरीन ड्राइव्ह पोलिसांनी हल्लेखोरांना अडवत ताब्यात घेतलं आहे. या घटनेनंतर बारसकर यांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

भारताचा पहिला डाव गडगडला

७ बाद २१९ धावा : इंग्लडच्या शोएब बशीरचे चार बळी

माणदेश एक्सप्रेस न्युज
रांची : भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना रांचीत सुरू आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने जो रूटच्या शतकी खेळीच्या जोरावर पहिल्या डावात ३५३ धावांपर्यंत मजल मारली. इंग्लंडने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी दुसर्या दिवशी भारतीय संघ मैदानावर मैदानात उतरला; पण इंग्लडच्या फिरकीपटूसमोर फलंदाजांनी नांगी टाकली. दुसर्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताने ७ गडी गमावत २१९ धावा केल्या. टीम इंडिया अजूनही १३४ धावांनी पिछाडीवर आहे. इंग्लंडच्या शोएब बशीर याने ४, टॉम हार्टले याने २ तर अँडरसन याने १ विकेट घेतली.भारताच्या यशस्वी जैस्वालने ७३ धावा केल्या.

इंग्लंडने सात बाद ३०२ धावांवरून खेळण्यास सुरुवात केली. ५१ धावांची भर घालताना संघाने उर्वरित तीन विकेट गमावल्या. रवींद्र जडेजाने उर्वरीत तिन्ही विकेट घेतल्या. इंग्लंडला ३४७ च्या स्कोअरवर आठवा धक्का बसला. रवींद्र जडेजाने ऑली रॉबिन्सन आणि जो रूट यांच्यातील १०२ धावांची भागीदारी मोडली. यानंतर षटकाच्या चौथ्या चेंडूवर जडेजाने शोएब बशीरला रजत पाटीदारकरवी झेलबाद केले. रॉबिन्सन ९६ चेंडूत ५८ धावा करून बाद झाला. त्याला जडेजाने यष्टिरक्षक ध्रुव जुरेलकरवी झेलबाद करत इंग्लंडचा डाव गुंडाळला. पहिल्या डावात रवींद्र जडेजाने सर्वाधिक ४, आकाश दीप ३, मोहम्मद सिराज २ आणि अश्विनने १ विकेट घेतली.

रांची : कसोटीतील भारताच्या पहिल्या डाव्यातील अर्धशतकवीर यशस्वी जैस्वाल

भारताची पहिल्या डावाची सुरुवात खराब झाली. चार धावांवर भारताला पहिला धक्का बसला. जेम्स अँडरसनच्या चेंडूवर दोन धावा काढून कर्णधार रोहित शर्मा बाद झाला. अँडरसनने रोहितला यष्टिरक्षक फॉक्सकरवी झेलबाद केले. लंच ब्रेकपर्यंत भारताने पहिल्या डावात एक गडी गमावून ३४ धावा केल्या होत्या. लंचब्रेकनंतर भारताला दुसरा धक्का ८६ धावांवर बसला. शोएब बशीरने शुभमन गिलला पायचीत केले. त्याने ३८ धावांची खेळी केली. करता आल्या. शुभमनने यशस्वी जैस्वालसोबत ८२ धावांची भागीदारी केली. रजत पाटीदारच्या रूपात भारताला तिसरा धक्का बसला. त्याला इंग्लंडचा गोलंदाज शोएब बशीरने बाद केले. रजतने आपल्या खेळीत ४२ चेंडूत १७ धावांची खेळी केली. ३७ व्या षटकात भारताचा शोएब बशीरने ओली पोपकरवी जडेजाला झेलबाद केले. त्याने १२ चेंडूत १२ धावा केल्या.

४७ व्या षटकांत भारताला पाचवा मोठा धक्का बसला. शोएब बशीर याने यशस्वी जैस्वालला बाद केले. यशस्वी ११७ चेंडूत ७३ धावा काढून माघारी परतला. यशस्वीने आपल्या कसोटी कारकिर्दीतील तिसरे अर्धशतक झळकावले. या मालिकेतील हा त्याचा ५०+ चा चौथा स्कोअर आहे. यानंतर भारताला सलग दोन धक्के बसले. भारताला सरफराज खानच्या रुपाने सहावा धक्का बसला. त्याला टॉम हार्टलेने ५२ व्या षटकात झेलबाद केले. सरफराजला ५३ चेंडूत केवळ १४ धावा करता आल्या. ५६ व्या षटकात १७७ धावांवर भारताला सातवा धक्का बसला. फिरकीपटू टॉम हार्टलेने अश्विनला बाद केले.

अश्विन बाद झाल्यावर ध्रुव जुरेल याला कुलदीप यादव याने साथ दिली. दोघांनी ४२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करत टीम इंडियाचा धावफलक हालता ठेवला. दुसर्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताने ७ गडी गमावत २१९ धावा केल्या. ध्रुव जुरेल (३०) तर कुलदीप यादव हा १७ धावांवर खेळत आहेत. भारत अजूनही १३४ धावांनी पिछाडीवर आहे. इंग्लडच्या शोएब बशीर याने ४, टॉम हार्टले याने २ तर जेम्स अँडरसन याने १ विकेट घेतली.